# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/11/2023 (बुधवार) सकाळ

---

**डोंगरगांव पारधी बेडा येथील अवैध हातभट्टी चालकांवर पोलीसांची रेड कारवाई**

**एकुण ०१,३३,७५०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त, काटोल पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्त प्रतिबंधक कारवाई**

दिनांक ०१/११/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान पोस्टे काटोल हद्दीतील डोंगरगांव पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजुबाजुचे परिसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्याने पोलिस स्टेशन काटोल हद्दीतील डोंगरगांव पारधी बेडा येथे सुरू असलेल्या मोहाफुल गावठी दारू भट्टीवर रेड केली असता **आरोपी नामे— १) महेन्द्र प्रितम राजपूत वय २८ वर्ष, रा. पारधी बेडा डोंगरगांव २) विक्की आमच्या राजपूत वय २८ वर्ष, रा. पारधी बेडा डोंगरगांव, ३) दिनेश तेजा मारवाडी वय २० वर्ष, रा. पारधी बेडा डोंगरगांव ४) संजय अवचीत सोलकी वय ३७ वर्ष, रा. पारधी बेडा डोंगरगाव ५) अमरसिंग आमच्या राजपूत वय ३० वर्ष, रा. डोंगरगाव व ०५ महिला आरोपी** यांचे ताब्यातून १) मोहफुल सडवा एकुण ५२०० लिटर किंमती १०४०००/— रुपये २) मोहफुल गावठी दारु एकुण ३०५ लिटर किंमती १५२५०/— रुपये ३) लोखंडी ड्रम व इतर साहीत्य किंमती १४५००/—रुपये एकुण १,३३,७५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून एकुण १० आरोपीतांवर पोलिस स्टेशन काटोल येथे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री हर्ष ए. पोद्दार(भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि आशिष ठाकुर, सफौज चंद्रशेखर घडेकर, ज्ञानेश्वर राऊत, सुरज परमार, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, प्रमोद तभाने, संजय बान्ते, नितू रामटेके, पोलीस नायक होमेश्वर वाईलकर, मुकेश शुक्ला महिला पोलीस नायक वनीता शेन्डे, कविता साखरे तसेच पोलीस स्टेशन काटोल येथील पोलीस उपनिरीक्षक कोलते, पोलीस हवालदार लखन महाजन पोलीस नायक प्रविण पवार पोलीस शिपाई गुलाब भालसागर, गौरव यखाल, भुषन पलेरिया, रमेश काकड, दत्तात्रय दिन्डे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर